# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर वर्ष ३ रे अंक १४३ वा शनिवार दि.२८ ऑक्टोंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB, Legrand, HAVELLS, INDOASIAN, Finolex, KOLORS, USHA, PHILIPS, GreatWhite, SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com


## फडणवीसांचे 'मी पुन्हा येईन'; भाजपच्या ट्विटमुळे राजकीय भूकंपाचे संकेत?




मुंबई- महाराष्ट्र भाजपकडून एक ट्विट करण्यात आलं आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना सुरुवात झाली आहे. भाजपकडून ट्विट करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 'मी पुन्हा येईन' म्हणत असताना दिसत आहेत. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा राजकीय भूकंप पाहायला मिळेल काय? अशी शंका व्यक्त केली जात आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी दिल्ली दौरा केला होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही या दौऱ्याची माहिती नव्हती. गुरुवारी पंतप्रधान मोदी महाराष्ट्रात आले होते. त्यानंतर आज भाजपकडून ट्विट करण्यात आलंय. यात फडणवीस 'मी पुन्हा येईन' असं म्हणत आहेत. त्यामुळे पडद्यामागे काही गोष्टी सुरु आहेत का? अशी शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.व्हिडिओमध्ये देवेंद्र फडणवीस म्हणालेत की, शेवटी एवढच सांगतो, मी पुन्हा येईन. मी पुन्हा येईन, याच निर्धारानं, याच भूमिकेत. याच ठिकाणी नवमहाराष्ट्राच्या नवनिर्मितीसाठी. गावांना जलयुक्त करण्यासाठी, शहरांचा चेहरा बदलण्यासाठी. महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी, नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी, मी पुन्हा येईन.मी पुन्हा येईन या देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यामुळे विरोधकांनी अनेकदा त्यांची खिल्ली उडवली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीआधी मी पुन्हा येईनचा नारा दिला होता. पण, राज्यातील घडामोडींमुळे त्यांना मुख्यमंत्री होता आलं नाही. त्यानंतर एकनाथ शिंदे सरकारमध्ये त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्विकारलं होतं. त्यामुळे पुन्हा त्यांना मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली होती.भाजप महाराष्ट्रने देवेंद्र फडणवीसांचा व्हिडिओ शेअर केल्याने वेगवेगळे तर्कवितर्क लढवले जात आहेत. पण, भाजप नेत्यांकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे. भाजप नेते प्रविण दरेकर म्हणाले की, 'ट्विट करुन कोणी राजकीय संकेत देत नाही. एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील.' दुसरीकडे विरोधकांकडून निशाणा साधण्यात आलाय. आमदार अपात्रतेच्या निर्णय लागू शकतो. त्यामुळेच असा प्रकारचे ट्विट करण्यात आले असं एकनाथ खडसे म्हणाले.

## मराठा तरुणांच्या आत्महत्या अन् 'युवा संघर्ष यात्रा' स्थगित, रोहित पवारांची घोषणा

मुंबई : महाराष्ट्रातील तरुणांच्या, नागरिकांच्या हितासाठी राष्ट्रवादी काँग्रेसनं युवा संघर्ष यात्रा काढण्याचा निर्णय घेतला होता. आज या यात्रेचा चौथा दिवस होता. आमदार रोहित पवार हे या यात्रेचं नेतृत्व करत होते. पण अचानक ही यात्रा रद्द करण्यात येत असल्याची घोषणा रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केली. सरकार गंभीर नाही रोहित पवार म्हणाले, युवा संघर्ष यात्रा ज्यासाठी काढण्यात आली. त्यातील मुद्दे ४५ दिवसांत यात्रेदरम्यान सरकारकडून निकाली लागतील अशी आमची अपेक्षा होती. पण आजची राज्यातील परिस्थिती बघितली तर ज्यांच्यासाठी आम्ही लढत आहोत ते आत्महत्या करताना दिसत आहेत. यावर सरकारकडून कुठलीही ठोस पावलं उचलली जात नाहीएत. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री दिल्लीला गेले होते तिथं पंतप्रधनांशी सकारात्मक चर्चा होऊन तोडगा निघेल असं वाटतं होतं. पण पंतप्रधानांनी काल शिर्डीत बोलताना मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर काहीही भूमिका स्पष्ट केली नाही. जरांगेंची प्रकृती खालावली मराठा आरक्षणासाठी जेव्हा मनोज जरांगे यांनी पुन्हा उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला तेव्हा आपणही त्यांना पाठिंबा द्यावा यासाठी आम्ही दुसऱ्या दिवशी यात्रेत



चालत असताना अन्नत्याग करण्याचा निर्णय घेतला. याचा काहीतरी परिणाम होईल आणि सरकार निर्णय घेईल असं वाटतं होतं. पण तसं काही झालं नाही. दुसरीकडं जरांगे यांची प्रकृती खालवत आहे. यापार्श्वभूमीवर आजचा सकाळचा टप्पा संपल्यानंतर तिथेच आम्ही थांबलो. वातावरण चिघळू नये ही भूमिका छत्रपती संभाजीनगरमधून आलेले सर्व पदाधिकारी माझ्याकडं येऊन एक पत्र दिलं त्यात त्यांनी सर्व सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका व्यक्त केली. तसेच आम्हाला विनंती केली की, आज महाराष्ट्रात तरुणांच्या आत्महत्यांची परिस्थिती निर्माण झाली आहे, ती थांबवण्यासाठी राज्यात शांततेची गरज आहे. हे वातावरण आणखी वेगळ्या दिशेनं जाऊ नये, म्हणून आम्ही सर्वानुमते निर्णय घेत आहोत की, ही युवा संघर्ष यात्रा आपण काही काळ स्थगित करत आहोत.

भारताच्या 'त्या' नौदल अधिकाऱ्यांच्या फाशीच्या शिक्षेमागे इस्राइल कनेक्शन?पुन्हा यात्रा कधी सुरु होणार? जेव्हा योग्य वेळ असेल तेव्हा ही यात्रा पुढे नेण्यात येईल, त्याची सविस्तर माहिती कळवण्यात येईल. महाराष्ट्रातील जनतेला कुठलीही अडचण येऊ नये तसेच जे सध्या संघर्ष करत आहेत त्यांच्या पाठिशी राहू, असही यावेळी रोहित पवार यांनी स्पष्ट केलं.

## अमरावती - पुणे रेल्वे दररोज धावणार
## रेल्वे राज्यमंत्री दानवेंची आ. निलंगेकरांना ग्वाही

लातूर / प्रतिनिधी : - अमरावती - पुणे ही रेल्वे सध्या आठवड्यातून दोन दिवस धावत आहे. सदर रेल्वे दररोज सुरू करण्यात यावी अशी मागणी सातत्याने प्रवाश्यांकडून होत आहे. हि मागणी लक्षात घेऊन माजी. मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव व राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्याशी पत्रव्यवहार केला होता, तसेच रेल्वे राज्यमंत्री दानवे पाटील यांची प्रत्यक्षात भेट घेऊन ही रेल्वे दररोज धावणे प्रवाश्यांच्या किती सोयीची आहे हे सांगत अमरावती - पुणे रेल्वे दरारोज सुरू करावे अशी मागणी केली. या बाबत रेल्वे राज्यमंत्री दानवे पाटील यांनी सकारात्मकता दाखवत सदर रेल्वे दररोज धावेल अशी ग्वाही दिली.

सध्या आठवड्यातून दोन दिवस अमरावती - पुणे (०१४४०) ही रेल्वे धावत आहे. विदर्भ - मराठवाडा - पश्चिम महाराष्ट्र या विभागांना जोडणारी व अमरावती, अकोला, वाशीम, परभणी, हिंगोली, लातूर, धाराशिव व पुणे या आठ जिल्हयातून धावत आहे. हि रेल्वे या तिन्ही विभाग व आठ जिल्हयातील विध्यार्थी, व्यापारी व प्रवाशांच्या द्रष्टीकोनातून अतिशय



सोयीसकर आहे. या रेल्वे मुळे या आठही जिल्हयातील प्रवाशांच्या वेळेची व आर्थिक बचत करणारी ठरत असून याचा प्रवाशांना मोठा फायदा ही होत आहे, त्यामुळेच हि रेल्वे दररोज सुरु करावी अशी मागणी केवळ लातूरच नव्हे तर या आठही जिल्हयातून सातत्याने होत आहे. या रेल्वेमुळे प्रशासनालाही आर्थिक फायदा होऊ शकतो हि बाब लक्षात घेऊन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी अमरावती - पुणे ही रेल्वे दररोज सुरु करावी अशी मागणी केली, याबाबत रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव व राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्याशी पत्रव्यवहार केला होता. तसेच रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांची प्रत्यक्षात भेट घेऊन सदर रेल्वे या आठ जिल्यातील प्रवाशांसाठी किती महत्वाची आहे याबाबत सांगीतले. रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांच्याशी माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी चर्चा केल्यानंतर सदर रेल्वे दररोज सुरु करण्याबाबत सकारात्मकता दाखवलेली आहे, तसेच ही रेल्वे दररोज सुरु करण्यासाठी तात्काळ रेल्वे अधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन अमरावती - पुणे ही रेल्वे दररोज सुरु होईल अशी ग्वाही दिली आहे. याबददल रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील यांचे माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## आ. अभिमन्यू पवार यांनी घेतली हासोरी खु. व हासोरी बु. गावासंदर्भात मदत व पुनर्वसनमंत्र्यांची भेट....

औसा - औसा विधानसभा मतदारसंघातील हासोरी खु व हासोरी बु या गावामध्ये गेल्या काही महिन्यांपासून भूकंपाचे धक्के जाणवत असून यासंदर्भात सातत्याने येथील ग्रामस्थांशी भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न करीत भूकंपाच्या सौम्य धक्क्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून तात्पुरत्या स्वरूपातील टेंट उभारणीस ३ कोटी ५ लक्ष रूपये मंजूर करण्यात आले होते. मात्र ग्रामस्थांची मागणी शेडची आहे. यासाठी ९५२ तात्पुरत्या स्वरूपाचे निवारे उभारण्यासाठी १५ कोटी ४६ लक्ष रुपयांचा सुधारित प्रस्ताव १२ ऑक्टोबर रोजी सादर केला आहे.या संदर्भात पुन्हा (दि.२७) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी मंत्री अनिल पाटील यांची भेट घेऊन सदरील सुधारित प्रस्तावाला तातडीने निधीच्या तरतूदीसह प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली

मागच्या अनेक दिवसांपासून औसा विधानसभा मतदारसंघातील हासोरी खु. व हासोरी बु. गावांमध्ये भूकंपाचे धक्के सातत्याने जाणवत असल्याने संकटकाळात नागरिकांना सुरक्षित आसरा घेता यावा यासाठी तात्पुरत्या स्वरूपाचे निवारे (शेड) उभारण्यात यावेत अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी १० ऑक्टोबर रोजी



राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांची भेट घेऊन त्यांना केली होती. मा मंत्री महोदयांनी दिलेल्या सुचनेनुसार जिल्हाधिकारी, लातूर यांनी हासोरी खु. व हासोरी बु. गावांमध्ये ९५२ तात्पुरत्या स्वरूपाचे निवारे उभारण्यासाठी १५ कोटी ४६ लक्ष रुपयांचा सुधारित प्रस्ताव १२ ऑक्टोबर रोजी सादर केला आहे.या संदर्भात पुन्हा (दि.२७) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांनी मंत्री अनिल पाटील यांची भेट घेऊन सदरील सुधारित प्रस्तावाला तातडीने निधीच्या तरतूदीसह प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी केली. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करुन लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे.

# हिवाळी अधिवेशन कालावधीत 'कास्ट्राईब'चे धरणे आंदोलन

## महासंघाच्या नागपुरातील अधिवेशनात राज्यातील कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर : - शासनाने कंत्राटी भरती करू नये. जुनी पेन्शन योजना तत्काळ प्रभावासह लागू करावी. रिक्त पदे तत्काळ भरावीत. पदोन्न्तीत विनाविलंब आरक्षण द्यावे, आदी मागण्यांसंदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या हिवाळी अधिवेशन कालावधीत एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगळे यांनी शासनाला दिला. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करावे, असेही ते म्हणाले. या मागण्या पूर्ण न झाल्यास मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन करू, असे मत महासंघाचे कार्याध्यक्ष गणेश मडावी यांनी मांडले. महासंघाचे ४३ वे अधिवेशन नागपूरच्या जवाहर विद्यार्थीगृहात पार पडले. अधिवेशनाचे उद्घाटन माजी मंत्री नितीन राऊत यांच्याहस्ते झाले. माजी जिल्हाधिकारी वसंतराव खोब्रागडे, एसआरपीएफ समादेशक प्रियंका नारनवरे, प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड, माजी अप्पर आयुक्त सुधीर मेश्राम, डॉ. चंद्रशेखर मेश्राम, महासंघाचे महासचिव सुरेश तांबे, कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुमित भुईगळ, उपाध्यक्ष प्रभाकर सोनडवले, राजकुमार घोडेस्वार, राज्य शिक्षक संघटनेचे कार्याध्यक्ष बी.डी.धुरंदर, उपस्थित होते. महासंघाचे छत्रपती संभाजी नगरचे विभागीय अध्यक्ष मनोज कांबळे, लातूर जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे, सरचिटणीस अशोक माळगे, कार्याध्यक्ष गणेश







राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, संघटक नागरत्न कांबळे, शिक्षक संघटनेचे राहुल गायकवाड, सुभाष मस्के, पाटबंधारे विभागाचे अध्यक्ष निलराज बनसोडे, प्रसिध्दीप्रमुख बालाजी केंद्रे यांच्यासह महाराष्ट्रातील महासंघाचे विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. कास्ट्राईब कर्मचारी महासंघ महत्वपूर्ण काम करत आहे. सर्व सामान्यांचे प्रश्न महासंघ सोडवतो. भविष्यात या महासंघाचे कार्य एकजुटीने पुढे घेऊन जाण्यासाठी राज्यातील कर्मचाऱ्यांनी महासंघामध्ये सामील व्हावे. एकजुटीने कार्य करून महासंघास पुढे न्यावे, असे आवाहन राऊत यांनी कर्मचाऱ्यांना केले. खोब्रागडे, नारनवरे, गायकवाड, मेश्राम यांनीही कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. राज्यातील कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या माध्यमातून सर्व जाती धर्माच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत संवाद साधा. शासनाने डॉ. आंबेडकरांच्या वास्तव्य असलेल्या ४१ ठिकाणाच्या संवर्धनासाठी सुमारे ३९ कोटी रूपये निधी उपलब्ध करून दिला. या निधीसाठी पाठपुरावा करण्यामध्ये महासंघाचा मोलाचा वाटा आहे, याचे समाधान असल्याचे इंगळे म्हणाले. प्रस्ताविक महासंघाचे राज्य महासचिव सुरेश तांबे यांनी केले. सूत्रसंचालन विभूतीचंद्र गजभिये यांनी केले. आभार राज्य सरचिटणीस नरेंद्र धनविजय यांनी मानले. अधिवेशनास राज्यातील विविध जिल्ह्यातील ३० प्रमुख संघटनांचे पदाधिकारी सहभागी होते.

**अधिवेशानातील संमत ठराव**

जुनी पेन्शन योजना लागू करा. शासकीय कंत्राटी भरती, शाळांचे खासगीकरण करू नये. सर्व विभागांमध्ये नवीन पदभरती, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करा. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या पदोन्नती करा. शिक्षण विभागातील रिक्त पदे प्राधान्याने भरा, आदी ठराव अधिवेशनात एकमताने संमत करण्यात आले.

**'शिलेदारां'चा गौरव**

महासंघाचे सांगलीतील बाबासाहेब माने, सोलापूरचे जिल्हाध्यक्ष अरूण क्षीरसागर, नागपूर शिक्षक संघटनेचे भीमराव सालवणकर, वाहन चालक संघटना, सांगलीचे अध्यक्ष अमजद खान मिरजकर, नागपूरचे विभूतिचंद्र गजभिये यांच्या संघटन कौशल्याची दखल घेऊन त्यांना कास्ट्राईब शिलेदार या पुरस्काराने मान्यवरांच्याहस्ते अधिवेशनात गौरविण्यात आले.

**सभासद होण्याचे आवाहन**

मागासवर्गीय कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत एकत्रित लढा देणारा कास्ट्राईब कर्मचारी महासंघ आहे. या महासंघाचे सभासद होण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन लातूरचे जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे यांनी कर्मचाऱ्यांना केले.

## संपादकीय....

# असे व्हावे स्मार्ट विद्युत मीटरचे नियोजन, देखभाल आणि व्यवस्थापन

विजेची थकबाकी राहू नये म्हणून ही एक चांगली संकल्पना महावितरण राबवू इच्छित आहे. ती प्रत्यक्षात साकार होताना खालील काही बाबींचा विचार जरूर व्हावा. राजन बुटाला स्मार्ट मीटर बसवताना वीज वितरण यंत्रणेने काही बाबींचा विचार करावा विद्युत पुरवठा तसेच वितरण करणाऱ्या महावितरणकडून नवीन वर्षापासून ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर मोफत बसविण्यात येणार आहेत. विजेची थकबाकी राहू नये म्हणून ही एक चांगली संकल्पना महावितरण राबवू इच्छित आहे. ती प्रत्यक्षात साकार होताना खालील काही बाबींचा विचार जरूर व्हावा.१ : स्मार्ट मीटर बसवल्यानंतर विजेच्या बिलाचा भरणा झाला नाही तर लगेचच विद्युत पुरवठा खंडित होणार आहे. परिणामी प्रामाणिक ग्राहकांना या समस्येचा विनाकारण सामना करावा लागणार. कारण काही वेळेला नजरचुकीने वीज बिलाचा भरणा करणे राहून जाते. अशा वेळी त्या व्यक्तीचा विद्युत पुरवठा ताबडतोब खंडित न करता वीज ग्राहकाला सात दिवसांच्या मुदतीची सुविधा असावी आणि तसे सूचित करण्यात यावे. या मुदतीत बिलाचा भरणा न केल्यास त्वरित विद्युत पुरवठा खंडित होण्याची यंत्रणेत सोय असावी.२ : विद्युत पुरवठा, वितरण करणाऱ्या महावितरणने प्रत्येक ग्राहकाकडून दोन महिन्यांच्या बिलाएवढी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेतलेली आहे. स्मार्ट मीटर बसवल्यानंतर सुरक्षा ठेव महावितरणला स्वतःकडे ठेवून घेण्याची आवश्यकता नाही. सबब ही सुरक्षा ठेव प्रत्येक ग्राहकाला पूर्णतः परत करावी. यासाठी खालील पर्यायाचा विचार करता येईल.पर्याय : महावितरणकडे सुरक्षा ठेव म्हणून शिल्लक असलेली दोन महिन्यांची रक्कम ग्राहकांना परत करताना ती बिलातून वजा करावी किंवा स्मार्ट मीटरची वसूल करण्यात येणारी रक्कम सुरक्षा ठेवीमधून वजा करावी आणि तसे ग्राहकांना सूचित करावे.स्मार्ट मीटरची किंमत ३३००/– रुपये आहे त्यापैकी १८००/– रुपये केंद्राकडून सहाय्य म्हणून मिळणार आहेत उरलेल्या १५००/– रुपयांचा ग्राहकांच्या खिशावर ताण येणार आहे. महावितरणने वीज नियामक आयोगाची परवानगी घेऊन ही रक्कम ग्राहकांकडून वसूल करताना स्मार्ट मीटर असा वेगळा रकाना निर्माण करून त्यामध्ये वसूल केल्या जाणाऱ्या रकमेचा उल्लेख असावा. सुरक्षा ठेवीमधून स्मार्ट मीटरसाठी लागणारी रक्कम वजा केल्यानंतर उरलेली ठेव मासिक बिलातून वजा करून ग्राहकांना दिलासा द्यावा. स्मार्ट मीटरमुळे सुरक्षा ठेव घेण्याची गरज उरली नाही. त्यानंतर हा रकाना रद्द करण्यात येऊन वसुली बंद करावी आणि सुरक्षा ठेव हा कॉलम रद्द करावा.या प्रकारात ग्राहकांची लुटमार कशी आहे पहा :१ : स्मार्ट मीटरची किंमत : ३३०० /– रुपये .२ : केंद्राकडून मदत १८००/– रुपये. ३ : उरलेले १५००/– रुपये वसूल करण्यासाठी प्रती युनिट ०.१२ पैसे याप्रमाणे दरमहा ग्राहकांकडून पुढील १० वर्षे वसुली करणे हा ग्राहकांवर घोर अन्याय आहे. कारण केंद्र सरकारकडून मिळालेल्या मदतीची रक्कमच नव्हे तर त्याहून अधिकची रक्कम महावितरण ग्राहकांकडून वसूल करण्याच्या तयारीत असावी असे चित्र दिसत आहे. यासाठी खालील तक्ता पहा.साधारण ३०० युनिटचा वापर असणारे ग्राहक उदाहरण म्हणून घेऊ या.०.१२ पैसे प्रति युनिट याप्रमाणे १० वर्षात होणारी वसुली.स्मार्ट मीटर खर्च : ३००÷०.१२=३६/– रुपये प्रती महिना.३६÷१२(महिने)=४३२ /– रुपये वार्षिक वसुली.४३२÷१०(वर्षे) = ४३२०/–रुपये वसूल झालेली रक्कम.१० वर्षात वसूल होणारी रक्कम ४३२०/– रुपये प्रत्येक ग्राहकांमागे.स्मार्ट मीटरची किंमत : ३३००/– रुपये. केंद्र सरकारकडून मिळणारी रक्कम १८००/– रुपये वजा करता बाकी रक्कम उरते ती म्हणजे १५००/– रुपये. ही रक्कम वसूल करण्यासाठी ग्राहकांवर येणारा ताण पाहता, दहा वर्षाच्या कालावधीत होणारी अतिरिक्त वसुली : ४३२०–१५००=२८२०/– रुपये प्रत्येक ग्राहकामागे. म्हणजे एकूण २.७३ कोटी. ग्राहकांकडून लूटमारीच्या स्वरूपात वसूल करण्यात येणारी रक्कम किती असेल ? याचाच अर्थ महावितरण ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात कशी लुटमार करणार हे सिद्ध होते. थोडक्यात महावितरण केंद्राकडून मदत मिळत असतानाही अशी अवाढव्य लुटमार करू पहात आहे हे थांबायलाच हवे.३ : अत्यंत महत्वाचे : अनेक गृहनिर्माण संस्थांमधील फ्लॅटमध्ये बहुतांश वयस्कर नागरिकच राहतात. त्यांना प्रत्येकवेळी महावितरणचे कार्यालय गाठणे शक्य होत नाही अशावेळी एखाद्याचे मीटर बिघडले, खराब झाले तर ते एक आठवड्यात बदलण्याची व्यवस्था महावितरणने स्वतःहून करावी आणि ग्राहकाला तसे सूचित करावे. यामुळे ग्राहक व महावितरण कंपनी यांच्यामध्ये सामंजस्य निर्माण होऊन एक सांघिक नाते तयार होईल. मीटरच्या उपलब्धतेबाबत मात्र तशी अट कंपनीसोबत करार करताना असावी.स्मार्ट मीटरमुळे काही कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर गदा येऊ शकते. अशा कर्मचाऱ्यांना दुसरीकडे सामावून घ्यावे. यामुळे त्यांच्यामध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईल. या कर्मचाऱ्यांचा विनियोग फुकट वीज वापरणारे, वीज चोरी करणारे यांच्यावर कारवाई करण्यासाठी करावा. यामुळे विजेची चोरी करण्याचे धाडस होणार नाही. स्मार्ट मीटरमुळे थकबाकी राहणार नाही. यामुळे वीज कंपन्यांचा ताळेबंद सुस्थितीत राहण्याची अपेक्षा ठेवता येईल.

# गावकारागिरांना उभारी देणारी विश्वकर्मा योजना...!!

भारतीय ग्राम व्यवस्थेत खेडी स्वयंपूर्ण होती. कारण गावातल्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. त्यासाठी गावकारागीर असतं त्याला बारा बलुतेदार म्हणून ओळखले जात होते. काळानुरूप मोठे बदल झाले गावातली ही कारागीर मंडळी मागे पडली, मोठया प्रमाणात व्यवसायात तांत्रिकता आली. आता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त देशवासीयांना मोठी भेट दिली. त्यांनी पंतप्रधान विश्वकर्मा योजना सुरू केली आहे. नेमकी ही योजना काय आहे यावर टाकलेला हा प्रकाश...!!

पंतप्रधान विश्वकर्मा योजना ही पारंपारिक कौशल्य असलेल्या लोकांना त्यांचा व्यवसाय उभारण्यास मदत करेल. या योजनेत लोकांना केवळ कर्जच मिळणार नाही तर कौशल्य प्रशिक्षणही मिळणार आहे. लोहार, सोनार, कुंभार, सुतार आणि मोची यांसारखी पारंपारिक कौशल्ये असलेल्या लोकांना पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळेल. अशा १८ पारंपरिक कामांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. या योजनेबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

**तीन लाखांचे कर्ज मिळेल**

जर व्यक्तीकडे पारंपारिक कौशल्य असेल तर पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्जाची सुविधा उपलब्ध असेल. या योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते. पहिल्या टप्प्यात व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाख रुपयांचे कर्ज दिले जाते. यानंतर व्यवसाय विस्तारासाठी दुसऱ्या टप्प्यात २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध आहे. हे कर्ज फक्त ५ टक्के व्याजदराने मिळेल.

**कौशल्य प्रशिक्षण**

या योजनेत १८ पारंपरिक कामांचा समावेश करण्यात आला आहे. या १८ ट्रेडमध्ये लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून प्रशिक्षणही दिले जाणार आहे. तुम्हाला दररोज ५०० रुपये स्टायपेंड देखील मिळेल. याशिवाय पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र, ओळखपत्र, मूलभूत आणि प्रगत प्रशिक्षणाशी संबंधित कौशल्य अपग्रेड, १५,००० रुपयांचे टूलकिट प्रोत्साहन, डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन देखील दिले जाईल.

**अशी लागेल पात्रता**

१. भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.
२. योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या १८ व्यापारांपैकी कोणत्याही एकाशी संबंधित असणे आवश्यक
३. वय १८ वर्षांपेक्षा जास्त आणि ५० वर्षांपेक्षा कमी असावे.
४. मान्यताप्राप्त संस्थेचे संबंधित ट्रेडचे प्रमाणपत्र असावे.
५. योजनेत समाविष्ट केलेल्या १४० जातींपैकी कोणत्याही एका जातीचा असावा.

**अशी लागतील कागदपत्रे**

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे आधारकार्ड, पॅनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, बँक पासबुक आणि मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.

**अर्ज कसा करायचा**

१. सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट ििंळीहुरज्ञरीार.सीं.ळप वर जा.
२. येथे –श्रिू जपश्रळपश लिंकवर क्लिक करा.
३. पीएम विश्वकर्मा योजनेत नोंदणी करा.
४. नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तुमच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे येईल.
५. यानंतर, नोंदणी फॉर्म पूर्णपणे वाचा आणि तो पूर्णपणे भरा.
६. भरलेल्या फॉर्मसह सर्व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करा आणि अपलोड करावे.

या विश्वकर्मा योजनेतून अधिकाधिक लोकांना आपल्या व्यवसायात गतिशीलता आणण्यासाठी मदत होणार आहे. व्यवसायाला लागणाऱ्या अत्याधुनिक मशीन त्याअनुषंगाने लागणाऱ्या गोष्टी यातून करता येणार आहेत. ही नवी उभारी घेण्यासाठी एक उत्तम पर्याय सरकारने निर्माण करून दिला आहे. त्यासाठी तात्काळ नोंदणी करा, यासाठी योजनेसाठी जिल्हा स्तरावर श्री. चिंतामणी गुट्टे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांची नियुक्तीही केली आहे.त्यांचा संपर्क क्रमांक : मो. ९४२१८५९७७७, कार्यालय : ०२३८२–२२०१४४ तसेच सुविधा केंद्राचे राहुल राऊत संपर्क क्रमांक : ९५४५२२६६२२ आपणास अधिक विचारपूस करायची असेल तर वरील क्रमांकावर करता येईल. अधिकाधिक लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी केलं आहे.

युवराज पाटील
जिल्हा माहिती अधिकारी, लातूर

# अशोक विजया दशमी म्हणजे स्वाभिमान..

बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अशोक विजया दशमी १९५६ ला धर्मांतर करून जगातील सर्वात मोठी क्रांती केली. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर हे केवळ धर्म बदलण्यासाठी नव्हते तर हजारो वर्षांपासून अमानवी लोकांनी स्वतः ची चेच वर्चस्व कायम रहावे म्हणून माणसाला जाती जाती मध्ये वाटून, एका जातीला दुसऱ्या जातीसोबत कधीही समता व बंधुतेने वागता येणार नाही अशी व्यवस्था निर्माण केली. अशा निच माणसिकता असलेल्या लोकांनी जातीच्या आधारे लोकांना वेगवेगळ्या करून एक जात दुसऱ्या जातीपेक्षा उच्च कनिष्ठ माणुन त्यांचे शिक्षण, हक्क अधिकार नाकारून प्रत्येक जातीतील लोकांना गुलाम बनवून प्रगतीचे सर्वच मार्ग बंद करून ठेवले. यामुळेच जातीवाद, विषमता, भेदभाव खोलवर रूजला गेला. भ्रामक आणि काल्पनिक कथा व पात्र डोक्यात भरून येथील लोकांना कर्मकांडात अडकून ठेवले गेले. कर्मकांड मध्ये अडकून पडलेला समाज स्वतः चे अस्तीत्व व स्वाभिमान विसरूनच गेला होता. येथे कर्माला, गुणाला, विद्वतेला प्राधान्य नाही तर जातीला लोक प्राधान्य देऊळ केवळ जातीपुरताच विचार करून माणसिक गुलामांनी प्रगतीचे सर्व मार्ग आपल्याच हाताने बंद केले. यामुळे देशातील सामाजिक परिस्थिती एवढी अमानवी व निच पातळीवर पोहचली होती की येथे माणसाने माणसाला स्पर्श जरी केला माणूस बाटायचा. एवढी सामाजिक विकृती येथे पसरली होती. एकाच वर्णाचे वर्चस्व कायम राहण्यासाठी इतरांना कमी लेखून माणासाला माणसा पासून वेगळे करणाऱ्या निच माणसिकतेच्या लोकांनी माणुसकी, गुणवत्ता व कर्म यांना थोडेही महत्त्व न देता एकच वर्ण श्रेष्ठ म्हणून लोकांच्या मनावर लादले. हळूहळू लोकांना त्यांची सवय झाली व लोक गुलाम झाले. अस्पृश्यता, भेदभाव, जातीवाद, अंधविश्वास, पाखंड, थोतांड यामध्ये गुरफटलेल्या लोकांचा विकास होणे शक्य नाही. लोकांचा सर्वांगीण विकास करायचा असेल तर समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य आवश्यक असते. आणि मुळात ह्याच गोष्टी अगोदरच्या धर्मात वर्ज होत्या. माणसाला आवश्यक असणारे समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य व प्रगती करायची असेल तर स्वतः ची ओळख असणे आवश्यक असते. कारण जाती व्यवस्थेमध्ये व्यक्ती ओळख शुन्य व जातीची ओळख ही एकमेकां पेक्षा कमी जास्तच आहे आणि यामुळे कोणत्याही व्यक्तीचा विकास होऊ शकत नाही हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लक्षात आले. एकाच धर्मात असुनही धर्मातील लोक एकमेकां सोबत अमानुषपणे वागतात, एकमेकां सोबत भेदभाव पाळून एकमेकांना प्रगती करू देत नाहीत. हे अमानवी व निच प्रवृतीचे असल्याने धर्मांतर करावे लागणार तसच व्यवस्थेने मागास ठेवलेल्या लोकांचा सर्वांगीण विकास होईल. म्हणून बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा करून येथील मनुवादी व्यवस्थेला मोठा धक्काच दिला. जागतिक विद्वान असलेले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी जर धर्मांतर केले तर धर्माच्या ठेकेदारांची नाचक्की होईल याची जाणीव ठेकेदारांना झाली. धर्मांतरांच्या घोषणे नंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अनेकांकडून अनेक मोठमोठी आमिष आले. वेगवेगळ्या धर्माच्या धर्मगुरूंनी बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी आपल्या धर्मात यावे म्हणून चढाओढ केली. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्मांतरांचा उद्देश केवळ धर्म बदलले किंवा स्वहित साध्य करून घेणे हा मुळीच नव्हता. जागतिक विद्वान असलेले बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वतः साठी जगले असते तर आज आंबेडकर गृप यांनी आर्थिकदृष्ट्या जगावर राज्य केले असते. परंतु बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी निस्वार्थ पणे लोकांना हक्क अधिकारी मिळवून देण्यासाठी व लोकांना मान सन्मान आणि स्वाभिमान मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घातल्याने आंबेडकर हे नाव उच्चारताच ज्ञानाचे, मानवतेचे, समतेचे प्रतिक म्हणून डोळ्यासमोर सहज बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा चेहरा येतो. कारण याच महामानवाने जातीव्यवस्थेच्या निच संस्कृती मध्ये बसलेल्या प्रत्येक माणसाला जाती धर्मापेक्षाही महत्वाची ओळख निर्माण करून दिली ती म्हणजे माणूस. आणि याच माणसाच्या कल्याणासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करण्याचे ठरवले. परंतु काही केले तरीही जात जात नाही म्हणतात तेच खरे झ आले जेथे विषमता, अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी, अस्पृश्यता, गुलामी असे किळसवाणे प्रकार राजेरोस चालायचे तेथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः ची स्वतंत्र ओळखी सोबत विकासासाठी धर्मांतर करण्याचे ठरवले तेव्हा त्यांच्या सोबत बहुसंख्य महार लोक तयार झाले. धर्मांतर केवळ महारांसाठी नव्हते तर ज्यांना ज्यांना



या व्यवस्थेने छळले, जातीमध्ये विभागुन हक्क अधिकारा पासून वेगळे ठेवले, त्या सर्व लोकांच्या उद्धारासाठी धर्मांतर होते. मानसिक गुलामी मध्ये बसलेल्या गुलामांना ते कळालेच नव्हते. बहुसंख्य महार लोकांनी बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत धर्मांतर केले आणि एका मोठ्या समुहाचे स्वतंत्र अस्तीत्व निर्माण केले. ज्यामुळे त्यांना विकासाची सर्व दारे उघडे होऊन प्रगतीचा मार्ग मिळाला. लोकांमध्ये समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्याची भावना निर्माण होऊन ठासून स्वाभिमान भरला गेला. गुलामीचे साखळदंड तुटल्या गेले मानसिक दृष्टीने व सामाजिक दृष्टीने लोक स्वातंत्र्य झाल्याने शिक्षण रोजगार यांच्या माध्यमातून आर्थिक समृद्ध झाले. स्वतः ची ओळख असल्याने वैचारिक व समृद्ध त्याला बौद्ध म्हणु लागले. अंधविश्वास, पाखंड, थोतांड, कर्मकांड इत्यादी मध्ये फसुन न राहता, दैववादी न होता प्रयत्नवादी होउन स्वतः चे इतरांचे भविष्य उज्वल करण्याची शिकवण बुद्ध धम्मात असल्याने कोणत्याही विषमतेला स्थान नसल्याने माणवाचा उद्धार केवळ धम्मच करू शकतो याची खात्री. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना होती आणि तेच आज सत्यही झाले. ज्या उद्देशाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर केले तो उद्देश साध्य झाला. लोकांना स्वतः ची ओळख, अस्तित्व, मानसन्मान आणि स्वाभिमान मिळाला. स्वाभीमानी लोक निर्माण झाल्याने सर्वांगींन विकास व्हायला सुरवात झाली. अनेक लोक म्हणतात बौद्धांचा विकास आरक्षणाने झाला मुळात असे बोलणाऱ्या व्यक्तीच्या बुद्धीचीच किव येते कारण. महार अर्थात बौद्ध यांनाच आरक्षण नाही तर एस सी एस टी ओबीसी अंतर्गत हजारो जातींना आरक्षण आहे. मग महार सोडून इतर जातीतील लोक जेव्हा प्रगत होतात तेव्हा ते आरक्षणामुळे होत नाहीत का? आरक्षण शब्द आला की पहीले बोट जाते बौद्धांकडे. अर्थात बौद्धांना स्वतंत्र आरक्षण नाहीत. अनुसुचीत जाती या प्रवर्गाला आरक्षण आहे आणि त्या प्रवर्गातील एक जात म्हणजे महार आहे. म्हणजे केवळ महारांना आरक्षणाचा फायदा होतो, किंवा आरक्षणामुळे तेच समाज गेले असे मत व्यक्ती करणे म्हणजे केवळ आपले अज्ञान दाखवणे होय. अनुसूचित जातीमध्ये इतरही अनेक जाती आहेत त्या का प्रगत झाल्या नाही तर याचे उत्तर आहे त्यांना आरक्षण आहे पण त्या प्रगत का नाही झाल्या तर याचे एकमेव उत्तर आहे त्यांना एक स्वतंत्र असे अस्तित्व, ओळख नाही. आणि जातीच्या नावाखाली आजही त्यांना मागास समजून पुढे येऊ दिले जात नाही. ते धर्माचा भाग जरी असले तरीही धर्म नाव केवळ धुर्त लोकांच्या भल्यासाठी घेतले जाते. धर्माचे नाव घेऊन जातीतील लोकांचा विकास झालेला दिसतच नाही. जसे निवडून, मंदिर आणि मंदीरातील पुजारी व स्वंयघोषीत वर्णीय लोक जेव्हा आपल्या हिताची पोळी भाजून घ्यायची असते तेव्हाच ते नाव घेतात. बाकी ठिकाणी जात मजबूत असते. जसे मंदीरात पुजारी धर्माचे असतात पण धर्मातील जातीतील नसतात, नेते धर्माच्या नावावर मत मागतात पण जातीतील लोकांसाठी काम करत नाहीत. थोडक्यात काय तर धर्म आपापल्या सोईने वापरू जातीव्यवस्था मजबूत केली जाते. आणि जातीव्यवस्थेमध्ये जातीमध्ये पण उच्च निचता असल्याने वरच्या जातीतील लोकांच्या लाथा खाणारे लोक खालच्या जातीतील लोकांच्या चांगल्या बाता ऐकु शकत नाहीत. अशी परिस्थिती असतानाच सामाजिक विकास व सामाजिक स्थान निर्माण होऊ शकत नाही. आणि धर्माच्या नावाखाली धर्मांध बनवल्या गेल्याने स्वतंत्र व सत्य विचार करू शकत नाहीत, स्वाभिमान जागृत होऊ शकत नाही म्हणून अजूनही जातीची विषमता असलेल्या ठिकाणी मागासलेले पण दिसते. स्वाभिमान आणि अस्तीत्व मात्र आजही कोसो दुर आहे. थोडक्यात काय तर बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ धर्मांतर केले नाही, तर स्वतः ची ओळख निर्माण करून कायमस्वरूपी अस्तित्व निर्माण केले. वैचारिक परिपक्व समाज बनवून शिक्षणाचे व परिवर्तनाचे धडे दिले. शिक्षणाने व स्वतंत्र अस्तीत्वाने माणसामध्ये स्वाभिमानाची पेरणी झाली. म्हणून अशोक विजया दशमी हा केवळ धर्मांतर दिवस नसुन बुद्धाचे विचार माणासाला भौतिक व माणसिक प्रगतीचा मार्ग देतात व माणसिक प्रगती कधीच लाचार होत नाही म्हणजे स्वाभिमान नेहमी जागृतच असतो. अशोक विजया दशमीने आम्हाला खुप काही दिले आहे. आता गरज आहे फक्त आणि फक्त केवळ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मार्गावर चालून काम करण्याची. आपण बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्विकारून आचरण केले तर भारत बौद्धमय व्हायला वेळ लागणार नाही. अशोक विजया दशमीच्या समस्त मानव जातीला कोटी कोटी सदिच्छा.. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याला त्रिवार वंदन..

---------------------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# युध्द नको शांतता हवी







लातुर – लातुरात गांधी चौक येथे इस्त्राईल निषेधार्थ सर्व पक्षीय व सामजिक संघटना यांच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले याबाबत सविस्तर माहिती अशी की आंतरराष्ट्रीय स्थरावर इस्त्राईल हा देश हुकुमशाही पध्दतीने फिलिस्तीनवर रासायनिक हल्ले करुन संयुक्त राष्ट्राचे उल्लंघन करत आहे. ज्यामध्ये रुग्णालयावर हल्ला करुन निष्पाप नागरिकांना मारले जात आहेत ज्यात लहान बालके व महिला यांचा सहभाग आहे.तसेच गाजा पट्टी यात हवाई हल्ले करुन ६७०० लोक मुत्यूमुखी पडले आहेत तर १० लाख लोक बेघर झालेले आहेत फिलिस्तीन येथील जिवन जगणे कठिण झाले असुन विदेशी मदत पुरवठा हि थांबवण्यात आल । आहे विद्युत व पाणी पुरवठा बंद आहे तसेच जीवनावश्यक वस्तुचा पुरवठा इस्त्राईल ने थांबवला असुन आम्ही भारतीय म्हणून निषेध करतो. कारण भारत देशाने मानवतेला प्राधान्य दिलेलं आहे. कोरोना काळात जगात लस पुरवठा करुन मानवतावादी विचार व मानवतेचा संदेश दिलेला आहे तेव्हा भारताने मानवतेचा विचार करून इस्त्राईल सोबत चे आर्थिक, राजकीय, वस्तू पुरवठा आयात निर्यात बंद करण्यात यावी अशी आमची मागणी आहे हुकुमशाह पंतप्रधान इस्त्राईल बेंजामिन नेतन्याहू चा निषेध करत आहोत संयुक्त राष्ट्राने हुकुमशाह पंतप्रधान इस्त्राईल बेंजामिन नेतन्याहू आंतरराष्ट्रीय खटला चालवावा व फिलिस्तीन यांना न्याय देण्यात यावा अशी आमची मागणी आहे. यावेळी निवेदन तहसीलदार द्वारे महामहिम राष्ट्रपती, पंतप्रधान, रक्षामंत्री, गृहमंत्री भारत सरकार व जिल्हाधिकारी यांना माहितीस्तव स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले आहे निवेदनावर ॲड. मुहम्मद अली शेख ॲड .शमीम शेख , कलीम रजा.कुरैशी , सय्यद इमरान , असदमामु खोरीवाले, वाजीद मणीयार,ॲड मुश्ताक सौदागर, ॲड ला.रा.शेख , सय्यद सरफराज, सरफ़राज मणीयार, सह मान्यवर यांच्या स्वाक्षरीने निवेदन देण्यात आले असुन सर्वपक्षीय नेते पदाधिकारी तथा सामाजिक संघटना अध्यक्ष पदाधिकारी उपस्थित होते अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली

# बहुगुणी सफरचंद

सफरचंद निवडताना त्यावर असणारे केमिकल्स, खतं याबाबत अनेक प्रश्न विचारले जातात. तू मला हेल्दी खायला सांगितलंस कि मला त्रास झालाच समज. फळ खायचं म्हणून मी रोज मला पचत नाही तरी सफरचंद खातेय प्रियाला पचनाचा त्रास होत होता आणि स्वाभाविकच तिचा सूर तक्रारीचा लागला होता. पण पचत नाही म्हणजे काय होतं ? इति मी. मला सफरचंद खाल्लं कि खूप गॅसेस होतात. पोट बिघडतच. मी म्हणते, सफरचंद माझं पोट साफ कर आणि माझं पोट मला म्हणतं – बाई मला माफ कर तिच्या त्या तक्रारी सुरातलं यमक जाणवून आम्हा दोघींनाही हसू आलं.सफरचंद या फळाचा तंदुरुस्तीशी सहज संदर्भ लावला जातो . त्याला रप रश्रिश र वरू ज्ञशर्शी वेर्ली रुरू ही प्रचलित असणारी म्हण देखील कारणीभूत आहे.अलीकडेच जागतिक सफरचंद दिवस साजरा झाला त्यानिमित्ताने या बहुगुणी, सगळ्या ऋतूंमध्ये उपलब्ध असणाऱ्या फळाबद्दल!सफरचंद म्हणलं की काश्मिरी लाल , गोड खरपूस चवीचं फळ आपल्या डोळ्यासमोर येतं.सफरचंदामध्ये तंतूमय पदार्थ मुबलक प्रमाणात आढळतात त्यामुळे ज्यांना आतड्याचे विकार आहे पचनाचे विकार आहेत त्यांना सफरचंद गुणकारी आहे. मात्र सफरचंदामध्ये असणाऱ्या सॉर्बिटॉल साखरेमुळे काही लोकांना गॅसेसचा त्रास होऊ शकतो.सफरचंदामधील आणखी एक महत्वाचे पोषणमूल्य म्हणजे त्यातील हरितके ( फायटोकेमिकल्स ) क्वारसेटिन , कॅटचिन , क्लोरोजनिक आम्ल, अँथोसायनिन! या फ्लॅव्होनॉइड्समुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. पेशींचे आरोग्य सुधारते . विविध प्रकारचे कॅन्सर आणि आतड्याच्या विकारांपासून दार राहण्यासाठी हे पोषणमूल्य मदत करतात.शरीराला आवश्यक ऊर्जा पुरविणे , माफक शर्करेचा परिणाम शरीरावर करणे यासारख्या गुणांमुळे सफरचंद गुणकारी फळांमधील महत्वाचे फळ आहे.बाजारात विविध प्रकारची सफरचंदं उपलब्ध आहेत. सफरचंदाचा गोडवा आणि आकार यामुळे सफरचंदापासून बनविले जाणारे विविध पदार्थ देखील भारतीय आहारात आणि पाश्चात्त्य पाकशास्त्रात महत्वाचे आहेत. भारतातील बऱ्याच भागात सफरचंद संपूर्ण फळ म्हणून खाल्ले जाते. पाश्चात्य देशांमध्ये बेकरी पदार्थांमध्ये सफरचंदाचा वापर केला जातो.त्यासाठी लालसर पिवळ्या रंगाचे सफरचंद वापरले जाते. बेकरी पदार्थ तयार करताना वापरले जाणारे सफरचंद चवीने नेहमीच्या सफरचंदाच्या प्रजातीपेक्षा जास्त गोड असते.सफरचंद निवडताना त्यावर असणारे केमिकल्स, खतं याबाबत अनेक प्रश्न विचारले जातात. बाजारातून आणलेले कोणतेही फळ स्वच्छ धुवून घेणे हा त्यातील महत्त्वाचा भाग. ऑर्गेनिक पद्धतीने उगविले जाणारे सफरचंद देखील स्वछ धुवूनच त्याचा खाण्यासाठी वापर करावा. अनेक जण सफरचंदाच्या स्वच्छतेसाठी त्याचे साल काढून टाकतात. मात्र या सालीत तंतुमय पदार्थ सर्वाधिक असतात. त्यामुळे सफरचंद स्वच्छ धुवून घेणे ही उत्तम प्रक्रिया आहे.दाताचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी सफरचंद उपयुक्त फळ आहे . मधुमेहाचं प्रमाण कमी करण्यासाठी किंवा मधुमेह रोखण्यासाठी सफरचंद अत्यंत गुणकारी आहे.

# बाहुबली आमदार मुख्तार अन्सारीला १० वर्षांचा तुरुंगवास, पाच लाखांचा दंड; वाचा काय आहे प्रकरण

गाझीपूर : कपिल देव सिंह यांची हत्या आणि मीर हसन यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी गँगस्टर आणि नंतर उत्तर प्रदेशचा आमदार बनलेला कुख्यात गुंड मुख्तार अन्सारी याला गाझिपूर कोर्टानं शुक्रवारी १० वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा सुनावली.तसेच ५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. गँगस्टर ॲक्ट अंतर्गत त्याच्यावर करावाई करण्यात आली आहे. तसेच त्याचा जवळचा सहकारी सोनू यादव याला ५ वर्षांचा तुरुंगवास आणि २ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. मी तर तुरुंगात होतो – अन्सारी अन्सारी या प्रकरणात दोषी ठरल्यानंतर त्यानं आपले वकील ॲड. लियाकत यांच्यामार्फत कोर्टात आपली बाजू मांडताना सांगितलं की, या प्रकरणाशी माझा संबंध नाही. मी २००५ पासून तुरुंगात आहे. आम्ही हायकोर्टात या शिक्षेविरोधात अपिल करणार आहोत. त्या ठिकाणी आम्हाला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. काय आहे प्रकरण?सन २००९ मध्ये कपिल देव सिंह यांची हत्या तसेच मीर हसन या व्यक्तीवर हल्ला केल्याप्रकरणी मुख्तार अन्सारीवर गुन्हा दाखल झाला होता. पण नंतर २०११ आणि २०२३ मध्ये अन्सारीला या दोन्ही खटल्यात कोर्टानं दोषमुक्त ठरवलं होतं. दरम्यान, याच वर्षी एप्रिल महिन्यात अन्सारीला १९९६ मध्ये विश्व हिंदू परिषदेचे नेते नंदकिशोर रुंगटा आणि २००५ मध्ये भाजप आमदार कृष्णानंद राय यांच्या हत्या प्रकरणात १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती.

# शरद ऋतूमध्ये पित्तप्रकोप का होतो?

प्रत्यक्षात शरीरामध्ये उष्णता वाढून होणार्या पित्तप्रकोपाच्या विविध तक्रारींनी त्रस्त झालेल्या रुग्णांची सुरुवात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासुनच सुरु होते. पावसाळ्यानंतरचा शरद ऋतू हा पित्तप्रकोपाचा काळ. हा काळ मराठी महिन्यांनुसार अश्विन–कार्तिकमध्ये येणे अपेक्षित असते, म्हणजे साधारण दिवाळीच्या आसपास.मात्र सध्या पृथ्वीच्या कालचक्रामध्ये प्रदूषण आदी अनेक कारणांनी झालेल्या बदलांच्या परिणामी हा शरद ऋतूचा काळ ऑगस्टच्या शेवटी–शेवटी सुरु होतो, असे दिसते. प्रत्यक्षात शरीरामध्ये उष्णता वाढून होणार्या पित्तप्रकोपाच्या विविध तक्रारींनी त्रस्त झालेल्या रुग्णांची सुरुवात ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यापासुनच सुरु होते.




पावसाळ्याच्या शेवटी वातावरणातला उष्मा जसजसा वाढत जातो,तसतसा शरीरामध्ये उष्णता वाढून पित्तप्रकोपाचा त्रास होताना दिसतो. त्यामुळे उष्णता वाढणारा काळ तो पित्तप्रकोपाचा काळ असे म्हणायला हवे.वास्तवात वर्षा ऋतूमध्ये म्हणजे पावसाळ्यामध्ये अम्ल (आंबट) रसाचा नैसर्गिकतः प्रभाव असतो, ज्याच्या परिणामी शरीरामध्येही आंबट रस वाढतो. सहा रसांमध्ये आंबट सर्वाधिक पित्तप्रकोपक असल्याने आंबट रसाच्या प्रभावामुळे पावसाळ्यातच शरीरामध्ये पित्ताचा संचय होऊ लागतो म्हणजे शरीरामध्ये पित्त वाढू लागते. मात्र पावसाळ्यात वातावरणामध्ये असणारा ओलावा व गारवा शरीरामधील त्या पित्ताला प्रकुपित होऊ देत नाही. पावसाळ्यात शरीरामध्ये जमलेल्या पित्ताचा प्रकोप होतो, शरद ऋतुमध्ये,ज्याचे महत्त्वाचे कारण असते या दिवसांमध्ये वातावरणात वाढणारी उष्णता आणि निसर्गतः प्रबळ होणारा खारट रस. ऑक्टोबर हिटच्या उष्म्याच्या दिवसांमध्ये समाजाला सर्वाधिक त्रस्त काही करत असेल तर तो म्हणजे उष्णताजन्य पित्तप्रकोप.पित्ताचा प्रकोप म्हणजे शरीरामधील उष्ण तत्वामध्ये झालेली वाढ. या पित्तप्रकोपामुळे लोक वेगवेगळ्या स्वरुपाच्या तक्रारी या दिवसांमध्ये घेऊन येतात.ज्यामधील काही महत्त्वाच्या तक्रारी पुढीलप्रमाणे:रोजचेच जेवण तिखट लागणे (म्हणजे नेहमीप्रमाणेच वरण–आमटी–भाजी वगैरे बनवलेली असतानाही व त्यामध्ये रोजच्याच प्रमाणात तिखटमिरची घातलेली असतानाही ते तिखट लागणे, जिभेला झोंबणे असा याचा अर्थ होतो) अन्नामध्ये नेहमीसारखेच मीठ घातलेले असतानाही ते जेवण खारट लागणे ही तक्रारसुद्धा पित्तप्रकोपाचा धोका सूचित करते.त सेच आंघोळ करताना फ़ारसे गरम नसलेले असे कोमट पाणीसुद्धा त्वचेला गरम वाटणे, सूर्यकिरणे सहन न होणे, उन्हात गेल्यावर डोकं चढणे, या तक्रारीसुद्धा भावी पित्तप्रकोपजन्य आजारांच्या पूर्वसुचना असू शकतात.वास्तवात या तक्रारी म्हणजे काही आजार नाहीत. यांचा आजच्या वैद्यकशास्त्रामध्ये रोग म्हणून उल्लेखही केलेला नाही.मात्र मनुष्याच्या प्रत्येक लहानसहान तक्रारींना महत्त्व देऊन त्याचा स्वास्थ्य–अस्वास्थ्याशी संबंध जोडणारे आयुर्वेद चिकित्सक या लक्षणांना महत्त्व देतात.कारण या अवस्थेमध्ये शरीरामध्ये तुम्हाला प्रत्यक्षात रोग झालेले नसले तरी शरीरामध्ये पित्ताचे प्रमाण वाढत आहे,हे ओळखायला हवे. या अवस्थेमध्येच आजार व्यक्त झालेला नसतानाही केवळ लक्षणांवरुन भावी आजाराचे निदान करणे , हे आयुर्वेदतज्ज्ञांनाच शक्य असते.दुसरीकडे सर्वसाधारण व्यक्तींनीसुद्धा आपल्या शरीरामधील या बदलांचे महत्त्व ओळखून आपल्या आहारविहारामध्ये बदल केला तर पुढे जाऊन होऊ शकणा र्या पित्तप्रकोपजन्य(उष्णताजन्य) आजारांना टाळता येईल.

# चॉकलेट्स, चीज, कॅफिनमुळे सतत डोके दुखते का? डॉक्टरांनी सुचवले ‘हे’ उपाय

डोकेदुखीची तक्रार करणारे अनेक जण असतात. पण का चॉकलेट्स, चीज, कॅफिनमुळे सतत डोके दुखते का, जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात डोकेदुखीची तक्रार करणारे अनेक जण असतात. वैद्यकीय उपचार आणि सल्ला घेणाऱ्या रुग्णांमध्ये डोकेदुखीचा त्रास असणारे रुग्ण बहुसंख्य असतात.





विशेषतः ऑफिसमध्ये सतत स्क्रीनकडे पाहून काम केल्यामुळे अनेकांना डोकेदुखीचा त्रास होत असतो. अनेक लोक डोके दुखते म्हणून कधी काही गोळ्या घेतात; तर कधी डोकेदुखी सहन न झाल्याने अनेकांवर डॉक्टरकडे जाण्याची वेळ येते. डोकेदुखी ही बाब सामान्य असली तरी त्याच्या वेदना मात्र कधी कधी असह्य होतात. खरे तर प्रत्येक व्यक्तीच्या डोकेदुखीचे कारण वेगवेगळे असते.

डोकेदुखीची कारणे कोणती? डोकेदुखीची अनेक कारणे असू शकतात. शरीरात पाण्याची कमतरता, डोळ्यांवर किंवा मानेवर जास्त दाब, झोप न लागणे व वेदनाशामक औषधे जास्त खाणे यांमुळेही डोकेदुखी होऊ शकते. अनेकदा तणावामुळे खूप डोके दुखते. पुरेशी झोप न घेणे हेदेखील डोकेदुखीचे मुख्य कारण असू शकते. पण सातत्याने डोके दुखत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करणे तुम्हाला महागात पडू शकते. कारण– हे मायग्रेनचे लक्षण असू शकते. मायग्रेन हा सामान्य, मध्यम आणि व तीव्र स्वरूपाचा असतो. मायग्रेनमध्ये होणारी डोकेदुखी ही अत्यंत गंभीर आणि त्रासदायक असते. हे लवकर नियंत्रणात येत नाही. त्यामुळे मायग्रेनचा त्रास असलेल्या लोकांनी कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, या प्रश्नावर फोर्टिस रुग्णालयाचे (मोहालीचे असोसिएट कन्सल्टंट न्यूरोलॉजी) डॉ. इशांक गोयल यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती दिली आहे. चला तर जाणून घेऊ डॉक्टर काय सांगतायत ‘हे’ पदार्थ खाल्ल्याने होते डोकेदुखी आणि मायग्रेनचा त्रास डॉ. गोयल म्हणतात, मायग्रेनचा त्रास असलेल्या लोकांनी चीज, चॉकलेट आणि कॅफिन किंवा गोड पेये यांसारखे काही पदार्थ टाळावेत. त्यामध्ये फेनिलेथिलामाइन नावाचे संयुग असते; जे मायग्रेनला चालना देते. त्याचप्रमाणे केळी आणि बीअरमध्ये हिस्टामाइनसारखे इतर ट्रिगर असतात; तर आइस्क्रीम आणि वाईनमध्ये टायरामाइन असते.तसेच साखरेऐवजी वापरण्यात येणारे कृत्रिम गोडवा देणारे स्वीटनर, दारूचे अतिसेवन, खूप जास्त शेंगदाणे एका वेळी खाल्ल्याने, आइस्क्रीम, एमएसजीवाले पदार्थ खाणे यांमुळे मायग्रेन उदभवण्याची शक्यता असते. तसेच चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन मुबलक प्रमाणात आढळते. त्यामुळे मायग्रेनचा त्रास आणखी वाढतो.‘हे’ खाद्यपदार्थ खाल्ल्याने मायग्रेनचा त्रास होऊ शकतो दूर डॉक्टर सांगतात की, मायग्रेनपासून सुटका करून घ्यायची असेल, तर संतुलित आहार घेणे आवश्यक आहे. आपल्या आहारात ताजी फळे, भाज्या आणि योग्य अन्नपदार्थांचा समावेश करा.ओमेगा–३ फॅटी ॲसिड वाढल्याने मायग्रेन असलेल्या लोकांना मदत होऊ शकते. त्याचप्रमाणे सुक्या मेव्याचे सेवन केल्याने मायग्रेनग्रस्तांना फायदा होऊ शकतो. सुक्या मेव्यामध्ये मॅग्नेशियम आणि इतर महत्त्वपूर्ण पोषक घटक, तसेच न्यूट्रिएंट्स भरपूर असतात.भरपूर पाणी प्यायल्याने हायड्रेशनची पातळी चांगली राहिली, तर मायग्रेन टाळण्यास आणि त्याची लक्षणे कमी करण्यास मदत होऊ शकते.

# कुत्र्यांचे लसीकरण कसे करतात? लसीकरणाचा खरोखर फायदा होतो का?वाचा, तज्ज्ञ काय सांगतायत.

पाळीव कुत्र्यांचे लसीकरण कसे करतात, याविषयी अकोला येथील ‘पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटर्नरी ॲण्ड निमल सायन्स’चे सहअधिष्ठाता डॉ. धनंजय दिघे यांनी ‘लोकसत्ता’शी बोलताना सविस्तर माहिती दिली. काही महिन्यांपासून कुत्रा चावण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होताना दिसत आहे. कुत्रा चावल्यामुळे रेबीज हा आजार होऊ शकतो. त्यामुळे त्यावर त्वरित उपचार करणे गरजेचे आहे. कधी व कोणता कुत्रा आपल्याला चावेल, हे आपल्याला सांगता येत नाही. त्यामुळे कुत्र्यांचे लसीकरण केलेले असणे खूप जास्त महत्त्वाचे आहे. पाळीव कुत्र्यांचे लसीकरण कसे करतात, याविषयी अकोला येथील ‘पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटर्नरी ॲण्ड निमल सायन्स’चे सहअधिष्ठाता डॉ. धनंजय दिघे यांनी ‘लोकसत्ता’शी बोलताना सविस्तर माहिती दिली.पाळीव कुत्र्याचे लसीकरण कसे करतात? डॉ. धनंजय दिघे सांगतात, रेबीज आजाराचे गांभीर्य समजून घेणं खूप जास्त गरजेचं आहे. या आजारावर वेळेवर योग्य ते उपचार केले नाहीत, तर माणसाचा मृत्यूसुद्धा होऊ शकतो. अशा वेळी कुत्र्याचं लसीकरण करणं आवश्यक आहे. पाळीव कुत्र्याचं लसीकरण करण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाना, सरकारी दवाखाना, शहरामध्ये काही खासगी दवाखानेसुद्धा असतात किंवा महापालिकेचे दवाखाने असतात तिथे लसीकरण केलं जातं. लसीकरणाचा प्रभाव हा तीन वर्षांसाठी असतो; पण आपल्या देशामध्ये रेबीज हा आजार खूप सामान्य असल्यामुळे प्रत्येक वर्षी लसीकरण करणं गरजेचं आहे. प्रत्येक पाळीव प्राण्याचं आणि रस्त्यावरच्या कुत्र्यांचंही लसीकरण करणं गरजेचं आहे. कुत्र्याचे लसीकरण झाले की नाही हे कसे ओळखायचे?डॉ. दिघे सांगतात, कुत्र्याचं लसीकरण झालं की नाही हे ओळखता येणार नाही. पाळीव कुत्र्याला जर आपण खासगी दवाखान्यात किंवा सरकारी दवाखान्यात लसीकरणासाठी नेले, तर लसीकरण केल्याबाबत ते एक पुस्तक किंवा प्रमाणपत्र




देतात. अशा प्रकारे प्रमाणपत्राच्या साह्यानं आपण सांगू शकतो की, कुत्र्याचं लसीकरण झालं आहे; पण रस्त्यावरच्या कुत्र्यांचं लसीकरण केलं असेल, तर जो कोणी त्यांचा केअरटेकर असतो किंवा या कुत्र्यांची काळजी घेणारे असतात त्यांच्याशी संपर्क साधावा लागेल. ते लोक आपल्याला सांगू शकतात की, या कुत्र्यांचं लसीकरण केलं आहे की नाही.डॉ. दिघे पुढे सांगतात, खरं तर आपल्या देशामध्ये एवढ्या सोई–सुविधा नसल्यामुळे रस्त्यावरच्या भटक्या कुत्र्यांचं लसीकरण केलं जाण्याची शक्यता खूप कमी आहे. त्यामुळे भटका कुत्रा चावतो तेव्हा गृहीतच धरावं की, हा लसीकरण न केलेला कुत्रा आहे. अशा वेळी कुत्रा चावल्यानंतर लसीकरण आणि उपचारांचा कोर्स पूर्ण करावा.लसीकरणाचा खरेच फायदा होतो का? कुत्र्यांचे लसीकरण किती गरजेचे आहे याविषयी सांगताना डॉ. दिघे म्हणतात, एखाद्या कुत्र्याचं लसीकरण झालं आहे आणि त्यानंतर तो कुणाला चावला, तर त्यामुळे होणाऱ्या रेबीज आजाराचा धोका कमी होतो. कुत्र्याचं लसीकरण केल्यामुळे १०० टक्के फायदा होतो. चावण्याचा आणि लसीकरणाचा काहीही संबंध नाही. पिसाळलेला कुत्रा असो किंवा त्याला कोणी कुत्र्याला डिचवलं, तर कुत्रा हल्ला करणार; पण कुत्रा चावल्यानंतर आपण स्वत: काळजी घेणं अत्यंत आवश्यक आहे.

# संगमेश्वर तालुक्यातील हरपुडे गावातील आग्रेवाडी व मराठवाडी शिवसेना (उबाठा) गटाला दणका; आ. शेखर निकम यांना साथ देत ग्रामस्थांनी केला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

चिपळूण / प्रतिनीधी:– चिपळूण – संगमेश्वर मतदार संघातील हरपुडे गावातील आग्रेवाडी व मराठवाडी शिवसेना (उबाठा) गटाच्या लोकांचा पक्षप्रवेश कार्यक्रम जनसंपर्क कार्यालय, सावर्डे येथे पार पडला. यावेळी कार्यालयात एकच जल्लोष झाला आपला माणूस, आपला आमदार, शेखर सर आगे बडो हम तुम्हारे साथ है या प्रवेशकर्त्यांचा उत्साह पहाताना सरांनी केलेल्या जनसेवेची, विकास कामांची, त्यांच्या कामाच्या पद्धतीची अन त्यांच्यावर लोकांच्या असणा–या प्रेमाची एक वेगळीच प्रचिती सद्या जनतेमध्ये दिसत आहे. आमदार शेखर निकम यांनी मागील चार वर्षात सर्वच क्षेत्रात तसेच विविध योजनेंर्तगत अल्प कालावधीत रेकॉर्ड ब्रेक करत साडे तीनशे कोटी पेक्षा जास्तीचा निधी मंजूर करुन आणला आहे व नियोजनबद्ध खर्च करुन गावा–गावाचा विकास करत एक आदर्शवत नेतृत्वाचा ठसा उमटवला आहे. या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन हरपुडे गावातील आग्रेवाडी व मराठवाडी शिवसेना (उबाठा) गटातील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पक्षात प्रवेश केला. या प्रवेश कर्त्यामध्ये आग्रेवाडी येथील मनोहर आग्रे (वाडी गावकर),




राजाराम आग्रे (वाडी अध्यक्ष), अपर्णा आग्रे (महिलाध्यक्ष), आत्माराम पावसकर, रामचंद्र आग्रे, राजेश आग्रे, हर्षल आग्रे, दिलीप आग्रे, रामकृष्ण आग्रे, कृष्णा आग्रे, दिलीप आग्रे, शारदा आग्रे, वनिता आग्रे, अनिता पावस्कर, मयुरी आग्रे, प्रभावती आग्रे, सुलोचना आग्रे, दिक्षिता आग्रे, वैष्णवी आग्रे, सुवर्णा आग्रे, प्राची करंबेळे तसेच मराठवाडीतील अजित शिंदे, सुरेश किर्वे, अनंत शिंदे, सुजाता किर्वे या लोकांनी राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला. आमदार शेखर निकम म्हणाले हरपुडे गाव आणि माझे ऋणानुबंध फार जुने आहेत. गावातील विकास कामे करताना गटा–तटाचे राजकारण व पक्ष पाहिलेला नाही. जस ग्रामस्थांनी अडचणी सांगितल्या तस तसे तेथील अडचणी दुर करण्याचा प्रयत्न केला आहे आणि यापुढेही अडचणी सोडवण्यास व विकास कामे करण्यास कटीबद्ध असेन, फक्त आपली कायमची साथ अन सर्वांचा माझ्यावर असलेला विश्वास ढळू देवू नका. या थोडक्याशा काळात रुपये सवातीन कोटीचा निधी आणून नियोजित पद्धतीने मतदार संघाचा विकास करण्याचे धाडस केले आहे. हे सर्व आपल्या सारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यामुळे शक्य झाले आहे. काही कामे झाली नसतील, दुर्लक्षीत राहिली असतील ती आपण पुढील काळात पुर्ण करण्याचा प्रयत्न करणारच आहोत. माझ्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेऊन आपण सर्व ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलात त्याबद्दल तुमचे मन:पुर्वक स्वागत. आता सर्वानी एकमेकांना विश्वासात घेऊन पक्ष संघटना बळकट करा व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आप–आपल्या विभागात कसा वाढेल यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत रहा. विकासात्मक निधीची तुम्ही चिंता करु नका ती जबाबदारी मी स्विकारली आहे हा शब्द आमदार निकम यांनी विश्वासाने ग्रामस्थांना दिला. समाजकार्य, राजकारण करताना मात्र आपल्या कुंटुंबाकडे दुर्लक्ष करु नका यामध्ये कुंटुंबाची आर्थिक, मुलांची शैक्षणिक या गोष्टीत सक्षम रहा असा मोलाचा संदेश दिला.
यावेळी माजी पंचायत समिती सदस्य बाबूशेठ साळवी, सरपंच उस्मान सय्यद, नितीन भोसले, मंगेश बांडागळे, बाळशेठ पंदेरे, अमित जाधव, बंधु सुर्वे, जितेंद्र नलावडे, मंगेश कदम, अजय साबळे, इ. प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रा.शितोळे वैशाली बाजीराव यांना पीएच.डी. पदवी प्रदान

मुरुड : शिवाजी महाविद्यालय मुरूड ता.जि.लातूर येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वैशाली बाजीराव शितोळे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडून नुकतीच इंग्रजी विषयात पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. त्याबद्दल संस्थेच्या वतीने दि.२५/१०/२०२३ बुधवारी त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी निलंगा येथील माजी प्राचार्य मार्गदर्शक डॉ. रघुनाथ धोंडीबा कांबळे व सहमार्गदर्शक डॉ.कमलाकर गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली 'र्छीेंशश्र ढळींश्रशी री ींहश र्छीेंप झहीरीशी : – ड्डीीर्लीीीरश्र –परश्रूीळी ळप –ींपिर्शीी, ढ्रेपू रपव द्धहशारींळल ठशश्रर्शीरपलश (१८३७–१९०१)' या विषयावर विद्यापीठास प्रबंध सादर केला आहे.



या सत्कार समारंभास रुरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. अंकित अनिलराव नाडे तसेच सहसचिव अभिजीत अच्युतराव नाडे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी , प्राध्यापिका व प्राध्यापक उपस्थित होते. रुरल एज्युकेशन सोसायटीच्या सर्व विभागातून त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भिसे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मोरे सर यांनी मानले.

# हिंदू लिंगायतांना ओबीसी आरक्षणा मिळालेच पाहिजे, लातुरातील ३० ऑक्टोबरच्या मोर्चात प्रचंड संख्येने सहभागी व्हा

लातूर : हिंदू लिंगायत समाजातील ३२ पोटजातींना ओबीसी, एसबीसी व एनटी आरक्षण मिळावे, राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची संजिवन समाधी असलेल्या श्री क्षेत्र भक्तीस्थळ अहमदपूर येथे विकासासाठी २५ कोटींचा निधी तसेच श्री क्षेत्र कपिलधार मुख्य रस्त्याचा विकास करावा, मंगळवेढा येथे महात्मा बसेवश्वर यांचे राष्ट्रीय स्मारकाचे ६५ एकर जमिनीवर त्वरीत काम सुरु करावे या इतर मागण्यांसाठी येत्या ३० ऑक्टोबर रोजी शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक संघटनेच्यावतीने लातूर येथील गंजगोलाई ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय असा प्रचंड मोर्चा काढण्यात येणार आहे. या प्रचंड मोर्चात हिंदू लिंगायत व लिंगायत बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अखिल भारतीय वीरशैव लिंगायत शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी लातूरच्या खंडोबा गल्लीतील वीरशैव भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले. आम्ही कायद्याच्या चौकटीत मांडणी करून आणि वेगळे आरक्षण न मागता लिंगायत समाजातील २४ पोट जातींना ओबीसी, एसबीसी, एनटीमध्ये आरक्षण मिळवून घेतले आहे. आता उर्वरित ३२ पोटजातीसाठी आमचा लढा सुरु आहे. आम्ही वेगळे आरक्षण न मागता कायद्याच्या निकषानुसार मांडणी करून लिंगायत पोटजातीला आरक्षण मिळवून घेतले. याशिवाय मराठा आरक्षणाच्या बाबत ते म्हणाले, मराठा आरक्षण कायद्याच्या निकषावर मिळू शकेल, कारण राणे व बापट कमिशनने आणि मराठा नेत्यांनी, राज्यकर्त्यांनीच मराठा समाजाची फसवणूक केलेली आहे, आजही मराठा समाजाला फसवले जात आहे. मराठ्यांना आरक्षण मिळाले पाहिजे अशी आमची भूमिका आहे, मात्र ते कायद्याच्या निकषावर टिकणारे असावे, असे प्रा. मनोहर धोंडे यांनी यावेळी म्हटले आहे.
या पत्रकार परिषदेला विठ्ठल ताकबिडे नांदेड, उमाकांत शेटे पुणे, शिवा संघटनेचे प्रांत सदस्य दत्ता भाऊ खंकरे, लक्ष्मण विभूते, राम लखदिवे, कल्पनाताई वावगे, बसवराज धारशिवें, भिमाशंकर लखादिवे,




ज्ञानेश्वर लखादिवे, संगमेश्वर स्वामी, जगन्नाथ कोळंबे, अंतेश्वर तोडकरी, पद्मिनबाई खराडे, मीनाक्षी मुंदडा, चंद्रकांत वैजापूरे, सिद्धेश्वर पाटील, सुभाषअप्पा मुक्ता, संभाजीराव पाटील, नागनाथअप्पा डोंगरे, दिलीप कत्ते, शरद चौधरी, गणपतअप्पा धुळशेट्टे, युवराज बिराजदार, विलास खिंडे, संतोष शेट्टे, बाबुअप्पा बिरादार, शिवलिंगअप्पा रासूरे, चपळे, हेरकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# मराठा आरक्षणासाठी मांजरा पट्टा आक्रमक. नागझरी येथील मांजरानदीपात्रात आज जलप्रवेश आंदोलन. संभाजी ब्रिगेडचा जाहीर पाठींबा.

लातूर:– जिल्ह्यातील टाकळी ब सर्कल मधील मांजरापट्टयात मराठा आरक्षण आंदोलनाने जोर पकडला असुन दिनांक २७ ऑक्टोबर पासुन परिसरातील मराठा समाजाने नागझरी येथे साखळी उपोषण सुरू केले आहे तर आज दि २८ आक्टोंबर रोजी मांजरानदीपात्रात जलप्रवेश आंदोलन होनार आहे तेव्हा उध्या काय होईल याची तुफान चर्चा सर्वत्र सुरू आहे. आज नागझरी गावामध्ये सकल मराठा समाज मांजरा पट्टा.. तसेच टाकळी, जेवळी, हरंगुळ खुर्द. वरवंटी. रायवाडी दर्जी बोरगाव. भोईसमुद्रगा. सांगवी.साई. यांच्यावतीने मराठा आरक्षण मिळेपर्यंत नागझरी गावांमध्ये साखळी उपोषणाला सुरुवात झाली आहे. अंतरवाली सराटी ते महाराष्ट्रातील सर्व मराठा आरक्षण आंदोलक आमरण उपोषणासाठी बसली आहेत त्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि सरसकट मराठा



समाजाला पंन्नास टक्केच्या आत ओबीसी आरक्षण मीळावे या मागणीसाठी वरील सर्व गावातील समाज बांधव सामुहिकपणे आंदोलन करणार असुन आज छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे उमाकांत उफाडे यांनी पुजण करून आंदोलनाची रीतसर सुरूवात झाली यावेळी उपस्थित शेकडो आंदोलकांना संभाजी ब्रिगेड प्रदेश संघटक उमाकांत उफाडे.यांनी मार्गदर्शन करून मागणीसाठी संभाजी ब्रिगेडचा जाहीर पाठींबा दिला.नंतर परमेश्वर पवार नरेश पवार यांनी मार्गदर्शन केले यावेळी. श्रीराम साळुंखे.सुनिल पाटील. नागझरी निखिलेश पाटील जेवळी संतोष काळदाते . महादेव उबाळे. अशउल्लाखान.रघुनाथ घोडके इंद्रठना. श्रीराम महाडक. अशोक उफाडे. प्रताप उफाडे. भालचंद्र शिंदे. गजानन उफाडे.टाकळी. जाधव सांगवी यांच्या सहित शेकडो मराठा समाज बांधवांनी मराठा आरक्षण मिळाल्याशिवाय साखळी उपोषण सुरू ठेवण्याचा शिवनिर्धार करून गरज पडली तर आंदोलन आणखी तिव्र करु शासनास जेरीस आणुन लढाई जिंकूच असा ठाम शिवनिर्धार सामुहिक शपथ घेऊन करण्यात आला. तसेच जलप्रवेश आंदोलनासाठी गाधवड. लातूर परिसरातील बांधवांनी हजारोच्या संखेत उपस्थित रहावे असे अवहान संयोजकाच्या वतीने करण्यात आले.

# बांधकाम कामगारांना दिवाळी बोनस मिळण्यासाठी जोरदार मांगणी.

मुंबई / प्रतिनिधी :– महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने २५ ऑक्टोबर रोजी मुंबई बांद्रा येथील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयासमोर जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. त्यात सांगली जिल्हातील बांधकाम कामगारांनी आंबेडकरी चळवळीतील जीवदानी कार्यकर्ते मान.धनंजय शिवाजी वाघमारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अध्यक्ष आटपाटी तालुका,निवारा बांधकाम कामगार संघटना जिल्हा नेते यांनी बांधकाम कामगारांना दिवाळी बोनस मिळण्याबाबत धरणे आंदोलनात महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.यावेळी बांधकाम कामगार संघटना कृती समिती मुख्य निमंत्रक कॉम्रेड शंकर पुजारी,मुख्य संघटक आयु सागर तायडे,साथी विनिता बाळेकुंद्री,सुरेश पाटील आणि विविध जिल्ह्यातील कामगार,कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. धनंजय शिवाजी वाघमारे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) अध्यक्ष आटपाटी तालुका,निवारा बांधकाम कामगार संघटना जिल्हा नेते यांनी बांधकाम कामगारांना दिवाळी बोनस मिळण्याबाबत मा.सहाय्यक कामगार आयुक्त सांगली जिल्हा,मान.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांना निवेदन दिले आहे.



# डॉ. विपीन ईटनकर, जिल्हाधिकारी नागपूर यांची 'संकल्प' ला भेट संकल्प सेवाभावी संस्थेचा उपक्रम : लाखो अनुयायांनी घेतला संकल्पच्या निशुल्क भोजनाचा लाभ

नागपूर :– राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनात पवित्र दीक्षाभूमी येथे 'संकल्प' सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भारताच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या लाखो अनुयायांकरिता निशुल्क भोजन वितरणाचे आयोजन करण्यात आले होते. २३ ते २५ ऑक्टोबर पर्यंत अविरत तीन दिवस अनुयायांना भोजनाचे वितरण करण्यात आले. 'संकल्प' च्या भोजनदानाचे सोमवारला माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या हस्ते सुरुवात झाली. विषमतेच्या मुळांना उखडून फेकून माणुसकीची नवी फुलबाग फुलवणारा क्षण म्हणजे धम्मचक्र प्रवर्तन दिन होय. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ऐतिहासिक अशा रक्तविहीन धम्मक्रांतीचा जयघोष केला आणि अंधारात चाचपडणाऱ्या लाखो अस्पृश्यांना बुद्धाचा तेजस्वी प्रकाश दाखविला. संपूर्ण देशातून दीक्षाभूमीवर आलेल्या अनुयायांना भोजनदानाने 'संकल्प' च्या उपक्रमाची दरवर्षी प्रमाणे सुरुवात झाली होती. 'संकल्प' ही नोंदणीकृत सामाजिक संस्था मागील ३७ वर्षापासून दलित, शोषित, मागासवर्गीय समाजाच्या उत्थानासाठी अनेक विभिन्न कार्यक्रम सतत राबवित आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक, आर्थिक समतेचे व आमुलाग्र परिवर्तनाचे स्वप्न साकार करण्यासाठी ही संघटना सातत्याने झटत आहे. तसेच १९८७ पासून 'संकल्प' संस्थेव्दारे धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमास देशाच्या विविध प्रांतातुन तसेच महाराष्ट्राच्या वेगवेगळया जिल्ह्यतून तसेच गाव खेड्यातून येणाऱ्या लाखो भाविकांना दरवर्षी सतत ३ दिवस उत्तम भोजन उपलब्ध करुन देण्यात येत असते. सोबतच संकल्पच्या कार्यालयात मदत केंद्र, स्वच्छ स्वयंपाकघर क्षेत्र, भोजन वितरण कक्ष आणि अनुयायांच्या निवासाकरिता निवासी केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. धम्मचक्र प्रवर्तन दिनी नागपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिक्षाभूमी परिसरातील संकल्पच्या स्टॉल ला भेट देऊन भोजन वितरणाची व संस्थे मार्फत चालविल्या जाणाऱ्या इतर उपक्रमा संबधी माहिती घेतली. यावेळी त्यांनी संस्थे मार्फत वितरित होणाऱ्या भोजनाचा आस्वाद देखील घेतला. लाखोच्या संख्येने अनुयायी भोजनाचा आस्वाद संकल्पच्या माध्यमातून घेत असतात. कार्यक्रमाच्या यशस्वीते करीता संकल्प सामाजिक संस्थेचे पदाधिकारी सर्वश्री अशोक हुमणे, राजा करवाडे, अनिल नगरारे, शशी रायपुरे, विनय सहारे, विनोद शेंडे, किशोर टेंभुरकर ई. यांनी रात्र दिवस कठोर परिश्रम घेतले.




# 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' अभियानाचे ३१ ऑक्टोबर रोजी लातूर येथे आयोजन

लातूर :– दिव्यांग बांधवांच्या अडचणी लक्षात घेता राज्य शासनाने 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात या निमित्ताने एक दिवसाच्या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. लातूर येथील औसा रोडवरील थोरमोटे लॉन्समध्ये ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता अभियानाचे मुख्य मार्गदर्शक आमदार ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांच्या उपस्थितीत हे शिबीर होणार आहे. हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडावा यासाठी समन्व्यक नेमून त्या संदर्भातील आढावा बैठक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांनी घेतली.
जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच. व्ही. वडगावे, नगर पालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त रामदास कोकरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यावेळी उपस्थित होते. दिव्यांग बांधवांमध्ये विविध प्रवर्गातील दिव्यांग आहेत. त्यातील अनेक जण विभागीय स्तरावर तसेच शासकीय कार्यालयात जाऊन आपली तक्रार नोंदवू शकत नाहीत. त्यामुळे शासनानेच दिव्यांगांना आपल्या अडीअडचणी मांडण्यासाठी उपाययोजना केली आहे, त्यांना विविध योजनांचा लाभ तसेच त्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणुक करण्यासाठी शासनाने 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' हे अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत आयोजित एकदिवसीय शिबिरामुळे दिव्यांगांना वैश्विक ओळखपत्र, त्याचबरोबर शेत जमिनी संबंधित कागदपत्रे, जातीचे प्रमाणपत्र व अन्य आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त मदत होणार आहे. शासनाच्या विविध योजनातून तसेच सामाजिक संस्था यांच्या सीएसआर मधून उपलब्ध झालेली दिव्यांगांना लागणारी विविध उपकरणे देखील वाटप करण्यात येणार आहेत. या शिबिरासाठी येताना आधार कार्ड आणि पासपोर्ट आकाराचे फोटो सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE